कार्यालय पोलीस अधीक्षक
दिनांक ०६/१०/२०१७

गोपनिय सुत्राकडुन मिळालेल्या माहितीच्या आधारे मा. अभिनव देशमुख पोलीस अधिक्षक यांचे आदेशान्वये मा. महेंद्र पंडीत, अपर पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदिप आर. लांडे, सोबतचे पथकातील भाऊराव बोरकर, प्रेमकुमार दुर्गे, उध्दव नरोटे, प्रशांत पातकमवार, दुर्गा साखरे यांनी दिनांक ०६.१०.२०१७ रोजी मौजा कोटगल ते विसापुर रोड दरम्यान सापळा रचुन दारुची बेकायदेशिर वाहतुक करीत असतांना मिळुन आलेल्या महिंद्रा बोलेरो मॅक्सी ट्रक कंपणीचे जुने वापरते चारचाकी वाहन क्र. एम. एच. ३६ एफ १३०९ या वाहनाची अवैध दारु संबधाने झडती घेतली असता, नमुद क्रमांकाचे वाहनात किंमत २,१९,६००/- रुपये किंमतीची देशी दारु संत्रा प्रवरा नगर कंपणीच्या बॅच क्रं ६६, सप्टेंबर २०१७, असे नमुद असलेल्या प्लॉस्टिकच्या प्रत्येकी ९० मिली क्षमतेच्या एकुण ३,६६० सिलबंद निपा तसेच किंमत ४,००,०००/- रुपये किंमतीची दारुची बेकायदेशिर वाहतुक करीता वापरण्यात आलेले वाहन असा एकुण ६,१९,६००/- रुपयाचा माल जप्त केला.

घटनास्थळी मिळुन आलेल्या दारुच्या मालकी हक्कासंबधाने वाहन चालक तसेच त्याचे सोबतचे इसमांकडे चौकशी केली असता, अवैध दारुची तस्करी करणारा मुख्य आरोपी नामे आबिद शेख (एस. के.) रा. लकडगंज, पंचशिल बोध्द विहाराजवळ नागपुर यांनी नमुद वाहनात दारु साठा लोड केलेले वाहन हे मौजा कुही गावापर्यंत स्वत: पोहचवुन दारुचे बॉक्स भरुन असलेले नमुद क्रमांकाचे वाहन तसेच वाहनामध्ये पुर्वीच बसुन असलेला नामे रोहित हिरालाल रामटेके रा. देसाईगंज यास सोबतीला देवुन दारुचे बॉक्स भरलेले वाहन बॉबी गणेश गौरखेडे रा. डोंगरगाव ता. कुही जिल्हा नागपुर याचे ताब्यात देवुन वाहनातील दारु घेवुन मौजा कोटगल जिल्हा गडचिरोली येथे घेवुन जाण्यास सांगितल्याने त्याचे सांगणेवरुन व संगणमताने नमुद क्रमांकाचे वाहनात आबिद शेख (एस. के.) रा. लकडगंज पंचशिल बोध्द विहाराजवळ नागपुर यांचे मालकिचा देशी दारुचा माल घेवुन मौजा कोटगल येथे बेकायदेशिर वाहतुक करीत असतांना मिळुन आले. यातील आरोपीतांना गडचिरोली जिल्हा हा दारुबंदी जिल्हा असल्याचे माहित असतांना सुध्दा शासनाने जारी केलेल्या आदेशाचे उल्लंघन केले असल्याने नामे १. बॉबी गणेश गौरखेडे रा. डोंगरगाव ता. कुही जिल्हा नागपुर २. रोहित हिरालाल रामटेके रा. देसाईगंज ता. देसाईगंज जिल्हा गडचिरोली तसेच आरोपी आबिद शेख (एस. के.) रा. लकडगंज पंचशिल बोध्द विहाराजवळ नागपुर यांचे विरुध्द पोलीस स्टेशन गडचिरोली येथे महा. दारुबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अशा प्रकारच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाई मुळे आंतरजिल्हयातुन दारुची तस्करी करणा-या इसमांवर आळा बसला असुन दारु तस्करी करणा-या लोकांचे धाबे दणाणले आहेत.

